G.M.D. ARTS, B.W. COM. & SCIENCE COLLEGE, Sinnar 422103

मराठा विद्या प्रसारक समज नाशिक
गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर
संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग
आर्मी डे अहवाल

दि.१५/०१/२०२२

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि संरक्षण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जाने.२०२२ आर्मी डे आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी व्ही रसाळ, प्रमुख मार्गदर्शक आर व्ही पवार, प्रा.दिपक खुर्चे,प्रा.सी ई गुरुळे, आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा.दिपक खुर्चे यांनी पाहुण्याची ओळख व प्रास्ताविक केले. प्रमुख मार्गदर्शक आर व्ही पवार यांनी आपल्या मनोगत म्हटले कि, भारतीय भूसेना दिन १५ जानेवारी ला संपूर्ण देशात साजरा करण्यात येतो. यासाठी दोन कारण आहे पहिले म्हणजे १५ जानेवारी १९४९ रोजी शेवटचा कमांडर इन चीफ फ्रान्सिस बुचर यांच्याकडून कमांडर इन चीफ के एम करिअप्पा यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. दुसरे कारण म्हणजे भारतीय बलिदानाचा आणि शौर्याचे कौतुक करण्याचा दिवस म्हणून हा दिवस साजरा केला जातो यानिमित्त नवी दिल्ली व सैन्य प्रमुख कार्यालयात परेड करण्यात येते. भारतीय भूसेनेने १९४७ युद्ध ,१९६२ युद्ध १९६५ युद्ध, १९७१ चे युद्ध आणि कारगिल युद्धामध्ये उत्कृष्ट कामगिरी करतांना दिसते. आज भारतीय सेना आधुनिक शास्त्रांनी सुसज्ज आहे. युवकांना मध्ये देशाविषयी प्रेम आदर निर्माण करण्याच्या हेतूने एन.एन.सी ची स्थापना करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रा.अभिन पोटे, प्रा.सी ई गुरुळे व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डी बी वेलजाळी यांनी केले व आभार प्रा.आर डी आगवणे मानले

प्रा.आर व्ही पवार
विभाग प्रमुख

डॉ पी व्ही रसाळ
प्राचार्य
जी.एम.डी. आर्टस, बी.डब्ल्यु कॉमर्स
ॲन्ड सायन्स कॉलेज, सिन्नर, जि.नाशिक

Scanned by CamScanner